प्रेस नोट दि.३०/१०/२०२३

राज्य कर अधिकारी, महाराष्ट्र शासन, वस्तु व सेवा कर विभाग, ठाणे या कार्यालयातील राज्य कर अधिकारी श्री. मधुकर सोमाजी ढोक, वय–५७ वर्षे, यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाच स्विकारतांना ताब्यात घेतलेबाबत.

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | नौपाडा पो.स्टे. जि. ठाणे |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | श्री. मधुकर सोमाजी ढोक, वय–५७ वर्षे, राज्य कर अधिकारी, महाराष्ट्र शासन, वस्तु व सेवा कर विभाग, ठाणे |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | २०,०००/–रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ७०००/–रू. स्विकारली |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीत ते टॅक्स कंन्सलटंन्ट चे काम करीत असुन त्यांनी त्यांचे क्लायंटचे ऑफीसच्या मेल आयडी वरून अॅप्लीकेशन भरून जीएसटी नंबर मिळविण्यासाठी शासनाच्या संबधीत जीएसटी, जूने कार्यालय, ठाणे यांना पाठविले. दिनांक २४/१०/२०२३ रोजी तक्रारदार यांचे संबधीत जीएसटी मंजूरीचे काम असणारे अधिकारी श्री. मधूकर ढोक (जीएसटी) वस्तू व सेवा कर कार्यालय, ठाणे यांचेशी संपर्क झाला असता, त्यांनी सदर कामाचे २०,०००/– रूपये लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि.२७/१०/२०२३ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईत आलोसे यांनी त्या अॅप्लीकेशनमध्ये त्रुटी करून शो कॉज न देण्यासाठी व जीएसटी नंबर रजिस्टर करून देण्यासाठी प्रथम २०,०००/–रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती ७,०००/–रू. स्विकारण्याची तयारी दर्शवुन आज दिनांक ३०/१०/२०२३ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे याने त्याचे कार्यालयात सदर लाचेची रक्कम ७०००/–रू. स्वत: स्विकारली असतांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन त्याचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. त्यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी–मा.श्री.सुनिल लोखंडे सो, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :– लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :– spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
५) टोलफ्री क्र. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(हणमंत क्षिरसागर)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned with CamScanner